# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३५७-२२** **दिनांक २६/११/२०२२**

## जबरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना गजाआड करण्यात अर्नाळा पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

अर्नाळा सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२/११/२०२२ रोजी ०१.३० वाजताच्या सुमारास डेवीड रेस्टॉरंन्टचे बाजुला नंदाखाल आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर येथे आरोपीत अमन शेख पुर्ण नाव पत्ता माहित नाही व त्याचे सोबत दोन मित्र यांनी फिर्यादी यांचे नंदाखाल येथील चिकन दुकानात जावुन फिर्यादी झोपलेले असताना त्यांना लाथा बुक्के मारुन फिर्यादीस झोपेतुन उठवुन आरोपीत अमन याने फिर्यादी यांची कॉलर पकडुन " चल आज किती धंदा झालाय पैसे् काढ" असे बोलुन आरडाओरड करुन फिर्यादीस मारुन टाकेल अशी धमकी देवुन फिर्यादी यांनी त्यांचे शॉपचे टेबलाच्या ड्रावरमध्ये ठेवलेले ४,१००/- रुपये हातात घेतले असता आरोपीत अमन याने फिर्यादीस धक्का देवुन लाथाबुक्यांने मारुन जबरदस्तीने त्यांचे हातातील दिवसभराच्या धंध्याचे पैसे हिसकावुन घेवुन जाताजाता फिर्यादीचे दुकानातील कोंबडी कापण्याचा सुरा घेवुन कोणास सांगितले तर बघुन घेईल अशी धमकी दिली होती. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी फिर्यादीवरुन अर्नाळा पोलीस ठाणे येथे दिनांक २३/११/२०२२ रोजी १६.४५ वाजता I गु.र.नं. ३६२/२०२२ भा.द.वि.स कलम ३९४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने अर्नाळा सागरी पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवून तांत्रिक माहिती गोळा करुन व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेत असतांना सदरचा गुन्हा सराईत आरोपीत अमन अरिफ शेख व त्याचे दोन अनोळखी साथीदारसह केला असुन ते नंदाखाल परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाल्याने सदर बातमीच्या आधारे सापळा रचुन नमुद सराईत आरोपीत नामे. १) अमन अरिफ शेख वय २२ वर्ष रा. नंदाखाल, ता.वसई, २) अनिकेत पांडुरंग पालकर, वय १९ वर्ष रा. संभाळ पाडा, सत्पाळा, ता. वसई यास ताब्यात घेवुन त्यांना नमुद गुन्हयात दिनांक २३/११/२०२२ रोजी २०.३२ वाजता अटक केली आहे.

नमुद आरोपीतांचे चौकशी दरम्यान आरोपीत - १) अमन अरिफ शेख २) अनिकेत पांडुरंग पालकर व पाहिजे आरोपी ३) राहुल पुर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी मिळुन सदर गुन्हयातील फिर्यादी यांना रात्रौ जोरजोरात लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्यांच्याकडुन जबरदस्तीने ४,१००/ रुपये हिसकावुन घेवुन त्यास कोंबडी कापण्याचा सतुरा ( सुरी ) यांची धमकी देवुन सोबत घेवुन गेला होता. यातील आरोपीत क्र १ हा मोटार सायकल चोरी करणारा सराईत गुन्हेगार आहे. नमुद आरोपीत याचेकडून गुन्हयातील जबरी चोरी केलेली रोख रक्कम पैकी ३,२००/- रुपये रोख रक्कम व ३००/- रु.कि.चा कोंबडी कापण्याचा सतुरा ( सुरी ) तसेच वालीव पोलीस ठाणे रजि.नं १०६०/२०२२ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे मधील चोरी केलेली २५,०००/- रु.कि.ची बजाज कंपनीची विक्रांत १५० लाल काळया रंगाची मोटार सायकल क्रमांक MH 48, AN 1785 अश्या वर्णनाची मोटार सायकल असा एकुण २८,५००/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आलेल्या आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नंबर, कायदा व कलम |
|---|---|---|
| १. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | गु.र.नं. I ३६२/२०२२ भा.द.वि.स कलम ३९४,५०६,३४ ( मुळ गुन्हा) |

| | | |
|---|---|---|
| २. | वालीव पोलीस ठाणे | गु.र.नं. I १०६०/२०२२ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली अर्नाळा सागरी पोलीस ठाणेचे श्री. अमरसिंह पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ रणजितसिंग परदेशी, पोहवा/शिवराम डामरे, पोहवा/ राजेंद्र पवार, पोअं/ राहुल कदम तसेच पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार कार्यालय नेमणुकीतील पोहवा/नामदेव ढोणे व पोहवा/अमोल तारडे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---ooo---